जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/११/२०२४
## दि.१७/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४९३/२०२४, भा.न्या.सं.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २६ वर्षे,रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/११/२०२४ रोजी १७/३० वा.चे.सुमारास हडपसर ते स्वारगेट असा पी.एम.पी.एल. बसमधून प्रवास करून बसमधून खाली उतरून जेधे चौक येथे चालत येत असतानाचे दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांची आई,बहिण असे हडपसर ते स्वारगेट असा पी.एम.पी.एल.बसमधून प्रवास करून बसमधून खाली उतरून जेधे चौक येथे चालत येत असतानाचे दरम्यान लोकांच्या गर्दीचा फायदा घेवून कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे गळयातील २०,०००/- रू किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र लबाडीच्या इराद्याने चोरून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.बी.पी.शिरसट,मो.नं.८४५९९०८६५७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३८४/२०२४, भा.न्या.सं.कलम ३१८(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६२ वर्षे,रा.गणेशमळा,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/११/२०२४ रोजी दुपारी १२/३० वा.ते १३/०० वा.चे सुमारास नवशा मंदिराच्या पाठिमागील अपुर्वा मेडिकल च्या समोर असणा-या बदामाच्या झाडाखाली |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी मोफत साडया व रोख ५०००/- रुपये गरीब लोकांना देत आहेत असे सांगुन स्वतःचे आर्थिक फायदयासाठी,लबाडीचे इरादयाने खोटी बतावणी करुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन हातचलाखीने फिर्यादी यांचे कडील रोख ३००/- रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण ५५,३००/- रुपये किंमतीचा ऐवज घेवून गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सचिन पवार मो.नं.७०३०४०२५८३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १२७७/२०२४, भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७१ वर्षे,रा.कोंढवा बु.पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/११/२०२४ रोजी दुपारी ११/४५ ते १२/१५ चे सुमारास आय.जी सुपर मार्केट,श्री ज्वेलस सोसायटी,टिळेकरनगर कोंढवा बु.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील एका अनोळखी इसमांने फिर्यादी यांचे जवळ येऊन येथे जवळपास हनुमान मंदिर कोठे आहे का असे विचारून माझी मावशी मयत झाली आहे तिच्या शांतीसाठी दोन हजार रूपये दान करायचे आहे परंतु मला सुतक असल्याने मी देवळात जावु शकत नाही तरी तुम्ही माझ्याकडील दोन हजार रूपये घेवुन तुमच्या आत्म्याला व गळयातील सोन्याची चेनला लावुन कोणालाही दान करा असे म्हणाला व त्याचेकडील दोन हजार रूपये फिर्यादी यांचे हातात देवुन गळयातील चेन गोड बोलुन काढायला लावुन फिर्यादी यांचेकडे |

| | |
|---|---|
| | दिलेले दोन हजार रूपये व गळयातील सोन्याची चेन फिर्यादी यांचे कडुन परत घेऊन ती चेन पाचशे रूपयाच्या नोटामध्ये गुंढाळली व त्याचे सोबत असलेल्या प्लॅस्टीक कॅरीबॅग मध्ये ती पुडी टाकुन ती पिशवी फिर्यादी यांचे कडे दिली व घरी जावुन ती पुडी उघडा असे म्हणुन तेथुन पळत जावुन काही अंतरावर उभा असलेला एका दुचाकी मोटार सायकल स्वराच्या मागे बसुन निघुन गेले अशा प्रकारे सदर दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे कडील ८०,०००/- रूपये किंमतीची सोन्याची चेन घेवुन जावुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.सुकेशिनी जाधव,मो.नं.९९२१४९८०८६ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी (बाणेर) पो स्टे ९२१/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४) सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७० वर्षे,रा.पाषाण पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/०८/२०२४ ते दिनांक १०/१०/२०२४ रोजी राहत्या घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी लिंक पाठवुन ॲप डाउनलोड करण्यास सांगुन त्यामध्ये शेअर मार्केटमध्ये गुतवणुक करण्याच्या माध्यमातुन थोडीशी रक्कम देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर एकुण १५,४५,०००/- रुपये ट्रान्सफर करण्यास संगीतले व त्याबदल्यात कोणताही परतावा दिला नाही तसेच फिर्यादी यांची मुळ रक्कम ही परत न देता फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे) श्रीमती पुरी,मो.नं.८१०८०६११०० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४६१/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४८ वर्ष रा.वारजे,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/०४/२४ ते दिनांक २५/०५/२४ रोजी फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे फेसबुकवर सर्फिंग करीत असताना यातील नमुद इसम यांनी शेअर मार्केट जाहिरात पाठवून त्याव्दारे फिर्यादी यांचे व्हॉटसॲप नंबर गृप मध्ये ॲड करून ग्रुपमधील ॲडमिन यांनी शेअर्स व ट्रेडींग आयपीओ मध्ये बल्क ट्रेडींग आणि हायब्रिड ट्रेडिंग करण्याचे नावाने गुंतवणूक करून सरासरी १०० टक्के याप्रमाणात मोबदला मिळवून देण्याचे खोटे आमिष देऊन जास्तीचा फायदा मिळेल असे प्रलोभन देवून फिर्यादी यांची एकुण १७,३६,०००/- रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) श्री.बडाख मो.नं.९९२३७३२९९९ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी (बाणेर) पो स्टे ९१७/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ सी,६६ डी |
| **फिर्यादी** | एक महिला वय ७४ वर्षे,रा.सुतारवाडी,पुणे |
| **आरोपीत** | बँक खाते धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/११/२०२४ रोजीचे दरम्यान रहाते घरी असताना ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा यातील अनोळखी व्यक्तीने अनधिकृतरीत्या ॲक्सेस घेवून फ्रॉड ट्रान्झेक्शन करुन फिर्यादी यांची एकुण १०,००,०००/- ची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे) श्रीमती पुरी, मो.नं.८१०८०६११०० |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ६१९/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१८(४),३१९(२),६१९२),३(५)सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २६ वर्षे,रा.चंदननगर पुणे |
| **आरोपीत** | बँक खाते लाभार्थी /युपीआय आयडी धारक व वापकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | गणेश रेड्डी पीजी,पैलवान जीम, चंदननगर पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील नमुद इसांनी ट्रेडींग मध्ये गुंतवणुक करून चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवून फिर्यादी यांना लिंक तसेच वरील सर्व लाभार्थी बँक खाते/ युपीआय आयडी धारक व वापरकर्ते यांनी संगनमत करून शेअर ट्रेडींग कंपनीचे एजंट |

| | |
|---|---|
| | असल्याचे भासवून फिर्यादी यांची एकुण १९,३८,०००/- रू.ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.श्री.माने, मो.नं.९१३००१२००५ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ९२०/२०२४,भा.न्या.सं.कलम २०४,३१९(२),३१८(४), ३(५)सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७४ वर्षे,रा.मॉडेल कॉलनी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/११/२०२४ रोजी ते दिनांक ०७/११/२०२४ रोजी पावेतो राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारकाने रेग्युलर तसेच व्हॉटसअॅप कॉल करून आयपीएस मुंबई पोलीस व बलदेव असे असल्याचे सांगुन फिर्यादी यांचे आधार कार्डचा वापर करून फिर्यादी यांचे नावे खरेदी केलेल्या पांढऱ्या रंगाच्या महिंद्रा स्कॉर्पिओ चा अपघात झालेला असुन त्यामध्ये एक व्यक्ती मरण पावला आहे व गाडीमध्ये ड्रग्स देखील मिळाले आहेत असे सांगुन फिर्यादी यांचेवर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. व ही केस क्लिअर करायची असेल तर सरकारी विभागाच्या बँक खात्यामध्ये तुमच्या बँक खात्यामध्ये उपलब्ध असलेल्या शिल्लक रक्कमेपैकी ८७ टक्के रक्कम ट्रान्सफर करावी लागेल असे सांगुन फिर्यादी यांचे नमुद बँक खात्यामधुन त्यांनी दिलेल्या बँक खाते वर एकुण १३,३०,१००/-रूपये ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे)श्रीमती ननावरे,मो.नं.८९७५७५२५४५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**